**कृपया प्रसिध्दीसाठी** **30 मार्च 2009**

## सामना सुरु होण्याआधीच गोंविंदाची घेतली विकेट- प्रकाश जावडेकर

**मुंबई, सोमवार:** कॉंग्रेसचे विद्यमान खासदार श्री. गोविदा यांनी निवडणुकीच्या मैदानातून पळ काढला असून राम नाईक यांनी सामना सुरु होण्यापूर्वीच एक विकेट घेतली आहे असे उद्‌गार भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ता व खासदार श्री.प्रकाश जावडेकर यांनी भाजयुमो व भारतीय विद्यार्थी सेनेच्या (भाविसे) युवक संमेलनात काढताच युवकांच्या हंशा व टाळयांच्या कडकडाटाने सभामंडप गुंजून गेले. यावेळी बोलताना श्री. प्रकाश जावडेकर म्हणाले, "देशभरातील युवकांना आश्वस्त करु इच्छितो की आज त्यांना भेडसावणा-या बेरोजगारीची समस्या सोडविण्यास श्री.लालकृष्ण आडवाणीचे नेतृत्व समर्थ आहे."

भाविसेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री. अभिजित पानसे यांनी आपल्या झंझावाती भाषणामध्ये युवकांना सांगितले, "या देशाचे उर्जामंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे महाराष्ट्राचे असूनही सगळयात जास्त लोडशेडींग महाराष्ट्रात होते. देशाचे कृषीमंत्री श्री. शरद पवार महाराष्ट्राचे तरीही सर्वात जास्त शेतक-यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होतात. देशाचे गृहमंत्री श्री. शिवराज पाटील महाराष्ट्राचे होते तरीही सगळयात मोठा दहशतवादी हल्ला महाराष्ट्रातच होतो. महाराष्ट्राची सतत उपेक्षा करणा-या युपीए सरकारला बदलण्याचा निर्धार युवकांनी करायला हवा. आपल्याला पंतप्रधान म्हणून श्री. लालकृष्ण आडवाणी हवे आहेत. दिल्लीच्या तख्तावर कृष्णाला बसविण्यासाठी आधी महाराष्ट्रातून 'राम' निवडून पाठवायचा आहे."

देशाला सर्वात मोठी समस्या भेडसावते आहे ती मंदी आणि बेरोजगाराची. आज दीड कोटी युवक बेरोजगार आहेत. निवडून आल्यानंतर ही समस्या प्राधान्याने सोडविण्याचा प्रयत्न करीन, असे श्री. नाईक यावेळी म्हणाले.

युवाशक्ती काय चमत्कार करु शकते हे राम नाईक यांना प्रचंड मतांनी निवडून देऊन आम्ही दाखवून देऊ असे वचन भाविसे चे सरचिटणीस श्री.अमोल कीर्तिकर यांनी दिले. भाजपा-मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी देशाच्या अंतर्गत सुरक्षितेच्या प्रश्नावर बोलताना म्हणाले, "साधी आयपीएल ची मॅच देशात या लोकांना घेता येत नाही ते देशातील नागरिकांना काय सुरक्षा देणार ?" भाजपा उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. योगेश सागर, भारतीय जनता युवा मोर्चा, उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. योगेश वर्मा, भारतीय विद्यार्थी सेनेचे उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. शशिकांत झोरे, शिवसेना नेते श्री. विनोद घोसाळकर, भाजयुमोचे मुंबईचे अध्यक्ष श्री. मिहिर कोटेचा आदींचीही भाषणे झाली. या युवक संमेलनात नवमतदारांचेही स्वागत करण्यात आले.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्‌धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**